
# प्राजक्त

स्नेहलता जपे



REFBK-0022862
REFBK-0022862

२५९५
२२८६२
काव्य

# प्राजक्त

REFBK-0022862

स्नेहलता जपे

प्रथम आवृत्ति
आक्टोबर १९७६

किंमत
पाच रुपये

मुद्रक व प्रकाशक :–
अरुण गडकरी
दिवा प्रिंटर्स अँड स्टेशनर्स
२९ सी, ताडदेव रोड,
मुंबई–४०० ०३४.
फोन :– ३७ ४६ ६२

# " कौतुक "

स्नेहलता जपे यांनी आपल्या मोजक्याच कविता या संग्रहात समाविष्ट केल्या आहेत. त्या सगळ्याच आकाराने आटोपशीर व सहज साध्या शैलीत लिहिलेल्या असल्यामुळे हा काव्यसंग्रह आपण केव्हा वाचून संपवितो ते कळतही नाही.

त्यांच्या कविता त्यांच्या स्वतःच्या वृत्तीशी प्रामाणिक राहिलेल्या वाटतात. त्यामुळे त्यात स्वाभाविकता उतरली आहे. प्रीती आणि भक्ती या दोनच भावनांचे सूर " स्वप्नवेड्या " वृत्तीने त्यांनी आपल्या काव्यातून सर्वत्र आळविले आहेत.

गीत माझ्या अंतरीचे
प्रेम रंगी भिजून गेले
कृष्ण–प्रीती शब्द–गाथा
नित्य ज्याचे सूर झाले

किंवा

प्राणाहून प्रिय मजला
काव्याचा कैफ धुन्द
वेचुनिया प्रीत–फुले
नाचत मी गान–लुब्ध

किंवा

श्रद्धेवर जगते मी
भक्तीची आस मला
प्रभुशी मम प्रीति–बंध
मुक्तीचा ध्यास मला ।।

या सारख्या ओळीत कवियित्रीने जणू आपल्या काव्यविषयक भूमिकेचे मर्मच सांगून टाकले आहे.

या दोन भावनांच्या ठिकाणी उपजतच असणाऱ्या विरह, हूरहूर, उत्सुकता, वेदना, समर्पणाची ओढ इ. भावच्छटा कवियित्रीने गडद निसर्गचित्रांतून हळुवारपणे साकार केल्या आहेत. त्यातील अभिजात संयम वाखाणण्यासारखा आहे. " आडवाट " सारखी राधा, मीराच्या वाटेने जाणारी समर्पित वृत्तीची कविता असो की, " स्वागत " सारखी लौकिक जीवनातील शृंगारावर आधारलेली कविता असो, त्यांच्या लेखणीतील हा संयम कोठेही ढळत नाही व त्यामुळेच या कवितांना स्वाभाविक हृदयंगमता प्राप्त झाली आहे.

आजच्या मराठी कवितेत आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने निरनिराळ्या प्रयोगांना महत्व आले असताना व त्यांचे सवंग अनुकरण होत असताना, आपल्या मनोवृत्तीविरुद्ध त्या खटाटोपात उगाच न पडता स्वत:लाच रुचणारा सूर आपल्या कवितेतून त्या आळवीत आहेत, या गोष्टीचेही मला विशेष कौतुक वाटते.

**— अनंत काणेकर**

मुंबई– ५-८-१९७६

# शुभेच्छा

स्नेहलता जपे यांच्या कवितांचे एक वैशिष्टच असे की त्यांच्यात अभिनवतेची "पोझ" नाही. कवयित्रीने आपल्या भावुक मनात निर्माण झालेल्या तरंगांना शब्दरूप दिले आहे. एखाद्या खानदान पुरंध्रीप्रमाणे हीं कविता आपली मर्यादा सांभाळणारी आहे. साहजिकच तिची वृत्ती आदबशीर आहे. तिला धिटावा आणि पुंडावा झेपत नाही, आणि नव्या फॅशनवर ती लुब्ध होत नाही. याचा अर्थ असा नव्हे की प्रीतीच्या नाना कळा तिला अवगत नाहीत किंवा सौंदर्याने ती हरखून जात नाही. किंबहुना प्रीतीची अबोध आणि सुबोध रूपे ही तिला नित्य मोहिनी घालीत असतात. सुंदरतेच्या दर्शनाने मनातली प्रीत जागी व्हावी आणि प्रीतीच्या आठवणीभोवती सौंदर्याची महिरप पडावी असा या कवितेचा स्वभाव आहे.

नव्याच्या हव्यासाने चंद्र-तारे-फुले-कमळे इत्यादिकांना काव्यविश्वातून हद्दपार करू पहाणाऱ्या मंडळींना पूर्वी कुसुमाग्रजांनी एका मार्मिक कवितेतूनच सवाल केला होता : ' चिरंतन सौंदर्याची विश्वमान्य प्रतीके आणि मानवी जीवनाला सुंदर आशय देणाऱ्या उदात्त कोमल भावना यांना कधी जुनेपण येते का? वार्धक्य येते का?' या सवालाचे नकारात्मक उत्तर सवालातच सामावले आहे. कालिदासाने नव्या-जुन्याचा संघर्ष पूर्वीच मिटवलेला आहे—

पुराणमित्येव न साधु सर्वं<br>
न चापि काव्यं नवमित्यवद्यम् ।<br>
सन्तः परिक्ष्यान्यतरद् भजन्ते<br>
मूढः परप्रत्ययनेय बुद्धिः ॥

सारांश सर्वच जुने ते सोने नव्हे. सर्वच नवीन ते निंद्य नव्हे. शहाण्यांनी नीरक्षीर विवेक करून सत्त्व घ्यावे आणि फोल टाकावे. असा विवेक केला की नव्याजुन्याची लटकी विभागणी संपते आणि रसिकता अधिक उदार होते.

माझ्या ज्येष्ठ प्रिय मित्रांनी— प्रा. अनंत काणेकरांनी कवयित्रीला धीर दिला आहे, कौतुक केले आहे. तो त्यांचा अधिकार आहे. मी शुभेच्छा देतो आणि आश्वासन देतो की कवितेच्या अद्‌भुतरम्य उद्यानात शंभरच काय हजार फुले फुलत असतात असा माझा अनुभव आहे. नव्या फुलांनी फुलावे; आपल्या गंधाचे, रूपाचे, प्रसन्नतेचे स्वागत होईल का या फिकीरीने पाकळीच मिटून ठेवू नये. जितकी फुले असतात तितके रंग असतात, तितके गंध असतात; आणि प्रत्येकाचा रसिकवृंद असतोच !

कवितेच्या क्षेत्रात गुरु एकच—‘कविता’ आपली आणि इतरांची. पूर्वसूरींची आणि समकालीनांची. कवितेच्या परिशीलनाने (म्हणजेच काव्यशास्त्रात ज्याला ‘अभ्यास’ म्हणतात त्याने) आणि कविता लेखनाच्या सातत्याने दोष मावळतात, सरसता वाढत जाते. हे ज्याचे त्यालाच करावे लागते. आत्मतुष्ट न राहता, मात्र आपल्या निर्मितीलाच पायबंद न घालता, हे तप आचरणे याला प्रतिभासाधन म्हणता येईल. स्नेहलता जपे असे तप आचरत राहतील अशी त्यांचे वाचक अपेक्षा बाळगतील. तिची पूर्ती त्यांच्या हाती.

**—वसंत बापट**

प्राजक्ताला बहर देणाऱ्या

ऋतुराज श्रावणाला—

# अनुक्रमणिका


- वाट माझी वेगळी ही
- चंद्राशी नाते
- आज चांदणे अमृत झाले
- कलश
- तृप्ती
- अमृत–गाथा
- परदेशी
- साक्षी
- चांदण्याची जखम
- दूर चंद्रमा सीमेवरती
- प्रीत
- स्वागत
- आडवाट
- कामना–कहाणी
- अभुक्त
- मेंदी
- विरही चंद्रम
- कधी पुन्हा
- मीलन
- अमृत
- मन भरतच नाही
- पहाट तारा
- लाट
- फुलपंखी
- प्रीति–स्वप्न
- संक्रमण
- राधेसाठी श्याम थांबला
- सहवास
- मदन–चंद्र
- वैकुंठाच्या वाटेवरती
- आषाढ–मेघ
- श्रावण
- अश्रु–सरी
- अमृत
- उदबत्ती
- अथांग
- चंदन

# वाट माझी वेगळी ही

वाट माझी वेगळी ही,
स्वप्न वेड्या जीवनाची,
रीत माझी आगळी ही,
भावभोळ्या यौवनाची।

गीत माझ्या अंतरीचे,
प्रेम रंगी भिजुन गेले,
कृष्ण प्रीति-शब्द-गाथा,
नित्य ज्याचे सूर झाले।

विश्व माझे हे निराळे,
निर्विकारी रूप ल्याले,
शुद्ध-भक्ती साज करूनी
सात्विकानें नित्य नटले।

वाट माझी वेगळी ही,
स्वप्न-वेड्या जीवनाची,
आणि माझी प्रीत अवघी
श्याम-वेड्या राधिकेची।

# चंद्राशी नाते

चंद्राशी नाते अन्
सोयरीक ताऱ्यांशी,
गंधाचे वेड मला,
रमते मन पुष्पांशी

प्रेमाचा छंद मला,
मेघासह मन रंगे
सुंदरता हीच सखी
फिरते मी तिजसंगे

प्राणाहुन प्रिय मजला
काव्याचा कैफ धुंद
वेचुनिया प्रीत-फुले
नाचत मी गान-लुब्ध

श्रद्धेवर जगते मी,
भक्तीची आस मला
प्रभुशी मम प्रीति-बंध
मुक्तीचा ध्यास मला

# आज चांदणे अमृत झाले

कोजागिरीच्या स्वप्निल रात्री,
निळ्या नभातुन कलश सांडले,
चंद्रम-वेड्या सागर-हृदयी,
धुन्द प्रीतिचे उधाण आले, आज चांदणे अमृत झाले।

तिमिर-दाटल्या आर्त दिशातुन,
नक्षत्रांचे मोहर फुलले,
शरद्-पौर्णिमा बहरुन येता,
आभाळाचे भाग्य उजळले, आज चांदणे अमृत झाले।

प्रणय-फुलांची अर्पित मदिरा,
प्रिया, तुझी मी साकी बनले,
मधु-शालेच्या रजत मंचकी,
शतजन्मांचे नाते जडले, आज चांदणे अमृत झाले।

तृप्त चांदणी-रात्र उमलता,
आनंदाचे डोळे भिजले,
युगविरही मी-व्याकुल वसुधा,
चंद्रकरांच्या मिठीत विरले, आज चांदणे अमृत झाले ।।

--

# कलश

आकाशाच्या अंगावरी
निळा नक्षत्रांचा शेला

चांदण्याच्या अमृताचा
वरी कलश सांडला

कसा बाई उलंडला
घट प्रीतिच्या रसाचा

कणकण शहारला
रातराणीच्या देहाचा

गुलाबांच्या गालावरी
दव-बिन्दू ओघळले

धुन्द आरशात त्यांच्या
रूप चंद्राने पाहिले

चांदण्याच्या अमृताचा
कसा कलश सांडला

लक्ष पाकळ्यांनी माझा
जीव फुलुनिया गेला

# तृप्ती

काय घडलं कसं घडलं ? चांदणी रात्र होती कां ?
— काहीच लक्षात नाही.
खिडकीवरचा दुधिया पडदा, कसा न् केव्हा झुकला,
काहीच कळलं नाही.
हळव्या चांदण्यात भिजून, कशा थरथरल्या कळ्या ?
काहीच आठवत नाही.
फक्त आठवतात अजून, उत्कट मिठीतले
भोळे, बुजरे क्षण...
गाऊ लागले जेव्हा, उत्तर रात्रीच्या धुंद...
ललत रागाचे सूर...
काळजातल्या चंद्राचं–मघाळ चांदणं, थेंब...थेंब ...
...उतरू लागलं–रक्तात.
पेटून उठल्या पेशी–देठा देठातून– आसक्तीच्या...
फुलझडचा फुलवीत.
कणाकणातुन विरघळली प्रतीक्षा–प्रलयंकारी...
जळणाऱ्या पाण्यात...
कोसळत्या काळाच्या–––अथांग आवर्तातून...
–––तरलेल्या वासनापत्रावर
उमटलं मुक्तिचिन्ह .... हिरण्यगर्भाच्या तेजातून
–––– तृप्तीच्या सोहळ्यात ॥

# अमृत - गाथा

धुंद बहर आला गेला
केवळ उरली आठवण आता,
कशी विसरू सांग प्रिया
लिहून गेलास अमृत-गाथा।

घन-नीळ आकाशाला,
कृष्ण-रात्र नशा होती,
ग्रीष्म-जळत्या मातीला अन्-
आषाढाची तृष्णा होती,

मेघ-दाटल्या रक्तात माझ्या
खोल उठली वीज-व्यथा
कशी विसरू सांग प्रिया,
लिहून गेलास अमृत-गाथा।

चिम्ब-भिजल्या प्राजक्ताचा,
देठ-देठ रंगला होता,
थेंब-गळत्या कळी कळीत,
तृप्त गंधित हुंकार होता,

यौवनाच्या पानापानात,
फुलून आली श्रावण कथा,
कशी विसरू सांग प्रिया,
लिहून गेलास अमृत-गाथा ॥

# परदेशी

बंधनात मी तू परदेशी,
कसे जुळाले अचूक धागे,
अवचित झाला काळ शिकारी,
विव्हल झालो आपण दोघे,
ठाऊक नव्हती भाषा तुजला
तरी दुभाषी बनले डोळे,
परस्परांच्या अंतरातले
भाव क्षणातच बोलुन गेले
धुन्द आर्जवी स्मितहास्यातुन
तुझ्या प्रीतीची बोली कळली,
अनामिका मी, तू परदेशी
तरी कशी ही हृदये जुळली
किती स्मरावे, स्वप्निल सुंदर
सहवासाचे क्षण सोनेरी
चांदण्यातली अमृत घटका
अजून झुरते नदी-किनारी
प्रणय फुलांच्या रजत मंचकी
प्रिया तुझी मी झाले साकी
किती अर्पिले किती घेतले
तरीही राहिले अजून बाकी
चंद्रकरांच्या मिठीत उत्कट,
आनंदाला अंकुर फुटले
असीम सुखमय व्यथा सोसुनी,
तृप्तीलाही आसू आले

# साक्षी

झुकता चंद्रम, मंद चांदणे
क्षितिज-कडेला शुक्र चांदणी
निळया मंचकी धुंद क्षणांचे
स्वप्न पाहिले प्रीत-फुलांनी

अधर-दलांच्या कळया-पाकळया
भिजून गेल्या दंव-बिन्दूंनी,
उमलुन आली सुगंध-गीते
निःश्वासांच्या पानोपानी

कळले नाही केव्हां गळली
भव-बंधाची श्रोणि-मेखला
अद्वैताच्या मीलन-समयी
साक्षी होऊन काळ थांबला

निखळुन पडली शुक्र-तारका
खोल सागरी चंद्र बुडाला
स्वर्ग-सुखाच्या जाणिवेत अन्
तृप्त जिवाचा प्राण हरवला

--

# चांदण्याची जखम

यौवनाच्या मुग्ध हृदयी,
स्वप्न-मधुरा प्रीत आहे,
विरह-भरल्या अंतरीची
अग्नि-रेखा जळत आहे ।

मीलनाची व्यथित गाथा
आज अधरी स्त्रवत आहे,
चांद्ण्याची जखम हृदयी,
पौर्णिमेची रात्र आहे ।

तारकांचे अश्रु पिऊनी,
रातराणी झुरत आहे,
कामनेचा गंध स्मृतिच्या—
पाकळ्यांना जाळिताहे ।

नित्य प्रीतीच्या कपाळी,
वेदनेचा शाप आहे,
गोकुळीचा श्याम अजुनी,
राधिकेला छळत आहे ॥

# दूर चंद्रमा सीमेवरती

शीतल श्यामल अश्विन महिना,
रात्र रेशमी धुन्द धुक्याची,
शरद्–ऋतूच्या हृदयी फुलती
फुले गुलाबी उत्कंठेची।

नक्षत्रांच्या ज्योती उमळित,
ऊंबरठयावर उभी दिवाळी
निळ्या नभाचा शेला आणिक
अरुण रंगमय साडील्याली।

दंव बिंदूंची मुक्ता–माला,
प्राजक्ताची कर्ण–भूषणे,
वेल जुईची बहरून येता
सुगंध–सौभाग्याचे लेणे।

व्याकुल झाले तुझ्या स्मृतीने
दिशा दिशातुन हसे दिवाळी
दूर चंद्रमा सीमेवरती,
मनात माझ्या अवस दाटली।

वियोग वेळी दुःख लपवुनी
हसत तुला मी निरोप दिधला
आज दिवाळी दारी येता
अश्रुसरींचा पूर लोटला।

दूर जरी तू मातेसाठी
सीमेवरती लढत राहसी
कलंक पुसुनी पराभवाचा
जय–चिन्हाचा तिलक लाविसी।

पुसते अश्रू धीर धरूनी
मनी आज जरी अवस दाटली
येशिल परतुन विजयी होऊन
होईल तेव्हा खरी दिवाळी ।

# प्रीत

प्रीत असावी कोमल हळवी,
कणाकणातुन विरघळणारी
मधुर मधाची अखंड धारा
नसानसातुन पाझरणारी

प्रीत असावी धुंद वादळी
चराचराला व्यापुन जावी
आषाढाच्या घनधारांनी
आतुर धरणी गंधित व्हावी

प्रीत असावी अशी अनावर
क्षणाक्षणाला उफाळणारी
अग्निफुलांची दाहक मदिरा
धमन्यामधुनी धगधगणारी

प्रीत असावी अक्षय अमृत
चैतन्याची ज्योत जागती
मृत्यूच्याही माथ्यावरली
चिरंतनाची ज्वाला जळती

# स्वागत

दारावरचे निळे रेशमी
पडदे झुलती लगबग करुनी
मेजावरची फुलदाणी ती
सज्ज कधीची फुले माळुनी
परिट घडीची सफेत चादर
स्वागतास हो अधीर आतुर
टिकटिक करते घड्याळ भोळे
वरती फिरतो पंखा भिरभिर ।
सावरीच्या मृदु उशीत हसते
'मधु-स्वप्नांची' नक्षी सुंदर
अवघडलेले दुग्धपात्र अन्
विरघळलेली कधीच साखर ।
अधरी तांबुस छटा रंगते
मनी घोळते मिश्किल थट्टा
उगीच हसते गुलाब कलिका
कुठे जरासा उशीर होता,
उशालगतचा दिवा मिटवतो
हळूच हसरा खट्याळ डोळा,
लाजलाजते नवीन साडी
सावरुनिया पदर आपला ।।

# आडवाट

शिरी सोसते स्पर्श विजेचा
मनांत स्वप्ने मधु - चंद्राची
भवबंधाचे पैंजण पायी
वाट चालते कुंज - वनाची ।

शापित माती ...... आडवाट ही..
या वाटेने गेली राधा,
कृष्ण - छंदमय - धुंद स्वरांची
हृदयी घेऊन प्रीती - बाधा ।

हरि - प्रेमाचे अमृत अधरी
काळजातले जहर निमाले,
अमर प्रेयसी मीरा - राणी
या वाटेवर तिची पाऊले ।

पत्थरासही फुटत पालवी
चंद्र–फुलांच्या मिठीत येथे,
मृत्तिकेस मग मुक्ती मिळता,
कणाकणातुन कांचन फुलते ।

या वाटेवर जीवन झुरते
करात घेऊन कर मृत्यूचा
समर्पणाचे अर्घ्य आर्पिता
प्राण उजळतो चैतन्याचा ॥

# कामना-कहाणी

अजुनी मोहरतो मृद-गंध,
ग्रीष्म-तप्त मातीतून
फुटती अनावर कोंभ
घन-आषाढ झेलून


अजुनी बहरतो प्राजक्त,
फुले धुंद रात-राणी
उमलून येती कळ्या,
गात मधुर गंध-गाणी

अजुनी कांपती ओठ
उगीच हंसती नयन,
क्षण थांवते काळीज
असे भेटता यौवन

अजुनी डहुळतो डोह
झुरे खोल खोल पाणी
अंत नाही आसक्तिला
अशी कामना-कहाणी

अजुन पाहते वाट,
कुणा प्रियाची अनाम,
आर्त व्यथित तृष्णेला
कधि भेटेल घनःश्याम ?

# अभुक्त



स्वर जुळती परि गीत कुठे
लय लागे परि ताल कुठे
रंग हसत परि चित्र कुठे
मूर्ति वसत परि प्राण कुठे

प्रणय - मधुर रात्र झुरत,
कुंज - वनीं श्याम नसे,
चांद - रात सलत मनी
राधिकेस चैन नसे

थेम्ब...थेम्ब...झरत चंद्र,
तृषित चक्रवाक कुठे
धुन्द - धुन्द - फुलत स्वप्न
मूर्तीचा मधु गंध कुठे

खोल तीव्र रक्त ओढ,
मुक्त काम क्षणहि नसे,
नित्य – नित्य – परि अभुक्त
जळणारा जीव असे

# मेन्दी

धुंद वादळी आकाशातून
आषाढाची झरती गीते,
घन – मेघांच्या ओठावरती,
चंचल बिजली - तान लहरते,

आतुर अवखळ मीलन घटका
मध्यान्हीच्या मनात झुरते
लाल रंगल्या मेन्दीवरती
श्यामल श्रावणधारा सलते

व्याकुल मादक मिठीत उत्कट--
आवेगाचा क्षण थरथरतो
अधर दलावर रसिक प्रीतिच्या
प्राजक्ताचा रंग बहरतो

धुंद वादळी आकाशातून
आषाढाची झरती गीते
उन्मादक एकान्त क्षणाना
मेन्दीची मग लाली चढते

# विरही चंद्रम



मनात येते संध्या समयी
स्मरशील का तू सारे क्षणभर?
चांदण्यातली भेट आठवुन
होशिल का तू असाच आतुर?

अजून स्मरते अधरावरला
स्वाद, सुधामय मधुबिंदूंचा
आठवतो का सुगंध तुजला
अंचलातल्या कळ्या-फुलांचा?

आठव आठव पुनवेचा तो
विरही चंद्रम, तांबुस पिवळा
मीलनातल्या मधुर घडीला
साक्षी केले आपण ज्याला!

प्रीत-वचन त्या धुंद क्षणाचे
पुन्हा पुन्हा मी हृदयी जपते
चांदण्यातल्या चढत्या घटका
आठवून मी जळत रहाते!!

# कधी पुन्हा

कधी पुन्हा भेटशील
स्वप्ने घेउनी डोळ्यात ?
रम्य एकान्त भेटीचा
पुन्हा कधी रे संकेत

तुझी धिटाईची भाषा
भेट जरी ती पहिली
आणि जाणताच हेतू
मन-कळी शहारली

मध्य रात्रीच्या क्षणाना
गंध चांदण्याचा मस्त
रात राणी बेहोषली
धुंद प्रीतिच्या कैफात

पुन्हा घडो ते मीलन
रति-मदनाला हेवा
अशा भेटीसाठी प्रिया
जन्म पुन्हा पुन्हा घ्यावा

२६९५
ग्रा. क्र. २२८६२
काव्य

# मीलन

तुझ्या प्रीतिचा तांबूल
माझ्या ओठात रंगतो

तुझ्या मानसीच्या मेघ
माझ्या उरी तरंगतो

किनारता तुझे ओठ
माझ्या गालावरी हासू

तुझ्या भाळी कृष्णछाया
माझ्या पापणीत आसू

तुझ्या आसक्तीच्या लाटा
माझ्या रक्ताला भरती

गात्रा गात्रात सांडती
गोड वेदनांचे मोती

तुझ्या माझ्या एकत्वाचा
असा साक्षात्कार व्हावा

सूर्य-पृथ्वीच्या मीलनी
जीव तेजात जळावा.

# अमृत

आकाशाच्या ओठी स्त्रवते
शीतल अमृत आषाढाचे
ग्रीष्म शापिता वसुंधरेच्या
अधरावर स्मित तृण-पुष्पांचे।

आर्त नभाची धुन्द कामना,
घन-मेघातुन विस्फुरणारी,
अन् धरतीच्या कातर देही
कंपन रेषा थरथरणारी।

युगायुगांची सरली तृष्णा,
गंधित कृष्णा वसुधा हसते,
वर्षा-रात्री भिजल्या नयनी
सफल क्षणांचे स्वप्न रंगते

आकाशाच्या ओठी स्त्रवते
शीतल अमृत आषाढाचे
तृप्त धरेच्या पोटी रुजते
बीज चिरंतन चैतन्याचे ॥

# मन भरतच नाही

मन भरतच नाही, किती घेतले तरी
तहान भागतच नाही, किती प्याले तरी

कसा आवरू मोहर, पुन्हा पुन्हा फुलतो
कामनेच्या बहरात, देह जळतच राहतो


पुन्हा पुन्हा उमलतात कळ्या फुले सारी,
फुलून जातो प्राजक्त, श्रावण येताच दारी

प्रीत व्यथा मनाची कशी सांगू तुला,
थेम्ब...थेम्ब-पेटतो, आग लागते पाण्याला

किती विले घेतले, सुखभोग परोपरी,
तरी तृषार्त जिवाची, आस अजुनी अपुरी

मन भरतच नाही किती घेतले तरी
तहान भागतच नाहीं किती प्याले तरी

# पहाट-तारा



धुंद काजळी रात्र असावी,
बावरलेला अधीर वारा
क्षितिजावरती विसावलेला,
एक असावा लोभस तारा

अंधाराच्या मिठीत मादक—
नक्षत्रांचे रूप पहावे,
तरंग-वलयी विरून जाता
निळ्या नभाचे भान हरावे

दंव-बिन्दूंचे दान मिळावे,
अर्ध-उमलत्या पुष्प-कळीला,
कमल-दलांच्या मंजुषेत मग,
बंदी व्हावा भ्रमर सावळा

धुन्द काजळी रात्र असावी,
अंधाराचा छंद मनाला,
मिटल्या नयनी विरघळणारा
एक स्मृतीचा पहाट-तारा

# लाट

अशीच फिक्कट संध्याकाळ
नक्षत्रांचे घोस लटकले
आभाळाच्या मनात हळूच
हळवे बिंब उमलू आले

'होय' 'नाही'च्या काठावर
फुटत होत्या लाटा
शोधीत होतास तेव्हा
काजळकडातल्या वाटा

आली लाट अनावर
वाहून गेली वाळू
किती जपले-लपवले
सारे आले कळू

# फुलपंखी

तलम रेशमी धुके
धुन्द रात्र शिशिराची
मनात हुरहूर अनावर
वाट नवख्या भेटीची

सुस्तावलेला रस्ता, मन्द,
थरारणारी थंड हवा
क्षणात झाली अवखळ
फुलपंखी इच्छा तेव्हा

कळी पाकळीत फुलांच्या
रहस्य मावेना प्रीतिचे
शिशिराच्या पहाटवेळी
वस्त्र गळाले धुक्याचे

# प्रीति-स्वप्न

पौर्णिमेची रात्र होती,
एक प्रीतिस्वप्न फुलले,
धुंद मदिरा चांदण्याची,
मी तुझ्या ओठात प्याले

गुंफुनीया हात हाती,
चालताना भान हरले,
मधुर वचने ऐकताना,
चांदणेही मुग्ध झाले

मोह झाला स्पर्श - वेडा,
बाहुपाशी बद्ध झाले,
यौवनाची भूल पडली,
देह देही विरून गेले

प्रीत - घटका भरून येता,
काय घडले मज न कळले,
मीलनाच्या त्या क्षणाला,
स्वप्न माझे सत्य झाले

# संक्रमण



पृथ्वीच्या जीवनी होअी संक्रमण,
अर्पितसे प्राण भानूराया
पृथ्वीच्या प्रत्यंगी शीतोष्णता येई,
प्रीतिसुख देअी, रश्मिराज

पृथ्वीच्या अंगांगी लावण्याची कांति,
साफल्याची शांति, काठोकाठ
पृथ्वीच्या उरोजी सुगंधी उद्याने,
सौभाग्याचे लेणे प्राप्त होई

पृथ्वीच्या पायात वेलींची पैजणें
फळांची भूषणे, स्कंधावरी
पृथ्वीच्या मनाला, सूर्याचा हव्यास
मीलनाचा ध्यास कल्पान्तीच्या

# राधेसाठी श्याम थांबला



मेघा आडून झरे चांदणे,
पिवळा चाफा उरी दाटतो,
धुन्द सुगंधी स्वप्नामधला,
उत्कंठेचा क्षण ओघळतो

प्राजक्ताच्या पाकळीतला
- गंध, अनावर व्यथा साहतो.
देठ - रंगल्या मेन्दीवरती,
दंव - बिन्दुचा अश्रू गळतो

चंद्राला क्षण मनात लपवून,
श्रावण - धारा बरसुन गेली,
गोविंदाचे चिंतन करिता,
प्रिया राधिका भान विसरली

झरू लागले पुन्हा चांदणे,
दूर कुठेसा पावा घुमला,
यमुना - काठी मध्य रात्रिला.
राधेसाठी श्याम थांबला

# सहवास


सख्या तुझा सहवास,
शुभ्र मोगरा फुलला,
धुंद गंध दरवळता,
जीव माझा लोभावला ।

सख्या तुझा सहवास,
गोड चांदणे चंद्राचे,
अभिलाषेच्या मेघात,
बिंब बुडाले देहाचे ।

सख्या तुझा सहवास,
प्रीत -- वारुणीचा प्याला,
रक्तरंगी आसक्तीने
काठोकाठ भरलेला ।

सख्या तुझा सहवास,
प्रेम--मंदिराची वाट,
पूर्ततेच्या पूजेसाठी,
मुग्ध शृंगाराचा थाट ॥

# मदन--चंद्र



प्रणयचंद्र झुलणारा
लाटांवर सागरात
चंद्र वेल झुरते मग
पुनवेच्या प्रांगणात !

पाझरतो चंद्रकंस
प्रीतीच्या अंतरात
फुललेले चंद्र-कमल
रात्रीच्या पापण्यात !

प्रतिभेचा प्राणनाथ
कंठमणि काव्याचा
शृंगारा शृंगारित
हृदय-भाव विश्वाचा !

जळते या देहातुन
उन्मादक चंद्र-ज्योत
उन्मीलित स्वप्न-धुंद
मदन-चंद्र मानसात ! !

# वैकुंठाच्या वाटेवरती

देह - बुद्धिच्या जात्यावरती,
जीव - जनाई अखंड दळते,
अहं - भावना दळण घालूनी,
फेऱ्यावरती फेरे घेते

फेऱ्यावरती फेरे झाले,
संपेना हे दळणे अजुनी,
आत्म - विठ्ठला तुला वाहते
भाव - भक्तिच्या ओव्या गाऊनी

चित्त-वृत्तिची मिटुन लोचने
सदैव तुजला हृदयी स्मरते
कसे आठवू रूप तुझे पण
बुद्धिच्याही पल्याड पुरते

उघडा प्रभुजी ज्ञान - कवाडे
युगायुगांची आस तिष्ठते,
वैकुंठाच्या वाटेवर मी
तुझ्या कृपेची भीक मागते

# आषाढ-मेघ

आषाढाचा पहिला मेघ क्षितिजावर दिसला नि उत्कट प्रीतीला प्राप्त झालेला विरहाचा शाप मेघदूताच्या रूपानं माझ्या डोळ्यांपुढें उभा राहिला. तप्त धरेच्या देहावर अमृतधारांचा वर्षाव करणाऱ्या सजल घनमालांनीं भूषित झालेलं अस्मान, आपल्या भव्यतेचा नीलिमा विसरून वसुधेच्या रम्यधूसर रंगाशीं एकरूप होऊन जात असतांना, प्राजक्ताच्या धुंद सुवासाची दौलत वाहून आणणाऱ्या शीतल वायुलहरींनी तुझ्या मानसमेघाचा स्मृतिसंदेश माझ्या विरहीं मनाच्या गवाक्षांतून प्रीतीच्या मंदिरांत पोंचविला. मेघमालिकेंतील तुषारांच्या मोत्यांनीं अलंकृत झालेल्या धरणीचा शृंगार पहात असतांना, माझ्या कंठांतल्या उत्कंठित मुक्तामालेचा एकेक मणी ओघळून जाऊं लागला! तुझ्या स्पर्शसुखाला अंतरलेली काया, ढगाआड लुप्त झालेल्या चंद्रकोरीप्रमाणं विरून जाते कीं काय असं वाटूं लागल, तुझ्या मुखकमलाभोंवती रुंजी घालणारे नयनभृंग पापणीच्या पाकळ्यांत बंदिवान होऊन पडले आणि तुझ्या कटाक्षानं विचलित होणारा अंचल आपली चंचलता विसरून, वक्षस्थली विसावलेल्या विरही कपोत-युग्माचा आधार होऊन राहिला! तुझ्या भेटीच्या पहिल्या दिवशीं लावलेल्या गुलाबाच्या कळ्या आतां उमलूं लागल्या आहेत, पण राजसा, तुझ्या उत्कट स्पर्शसुखानं सहवासाच्या क्षणी विकसित होणाऱ्या माझ्या अधरदलांची कवाडं मात्र मिटलेलीच आहेत! चांदण्यारात्रीं प्रीतीच्या वचनांना साक्षीदार झालेला सोनचांफा आषाढाच्या वर्षावानं बहरलेल्या सोनेरी कळ्यांना झेलीत उभा राहिलेला पाहतांच, पहिलीवहिली प्रीतिभेट म्हणून तूं दिलेली सोनचांफ्याच्या रंगाची साडी उलगडून अंगाभोवतीं लपेटीत आरशासमोर उभी राहिलें पण पाठीमागें तुझ्या प्रतिबिंबाचा आभास होतांच ती हातांतून कधी गळून पडली हें कळलं देखील नाही! आषाढाच्या महिन्यांत विरहव्यथा संपविण्याचं तूं दिलेलं वचन, घटकापळांच्या हिशेबात घोळवीत नि स्वप्नरंजनाच्या रंगांत रंगवीत बसलें असतानांच हा आषाढाचा पहिला मेघ क्षितिजावर उतरला आणि उत्कट प्रीतीला लाभलेला चिरवियोगाचा शाप त्यानं मला ऐकवला!!

# श्रावण

अविरत कोसळणाऱ्या श्रावणसरींनीं चिंब भिजून हंसणारी प्राजक्ताचीं फुलं पाहिलीं आणि गेल्या श्रावणांतली तुझ्यामाझ्या भेटीची उन्मादक घटका आठवून, रक्ताचा कणन्‌कण फुलून आला. असाच धुंद पाऊस कोसळत होता त्यादिवशी! आकाशांत दाटून आलेल्या घननील मेघांसारखी तुझ्या भेटीची उत्कंठा मनांत ओथंबली होती, दारात बहरलेल्या प्राजक्त–पुष्पांच्या देठादेठांतून ओघळणारे जलबिंदु, रक्त–रंगीं सुवासाची नशा चढवीत होते आणि तुझ्या स्पर्शासाठी आतुर झालेली तळ-हातावरची मेंदी, त्याच रंगांत भिजून भिजून झुरत होती!!

तुझ्या येण्याला विलंब करणाऱ्या पावसाला वर्षावाची ऊर्मि आवरण्याची मनोमन विनवणी करीत होते, त्याचक्षणी धुंदधूसर पावसाची पर्वा न करतां, भरवेगाने येणारी तुझी स्कूटर मी दुरूनच ओळखली. ब्रेक दाबून तूं मला हात उंचावला आणि अंगावरचा पावसाळी कोट काढून हातांत घेत जेव्हां तूं दारांत उभा राहिलास, तेव्हां मी पहातच राहिले! नेहमी लष्करी वेषांत असणारा तूं, आज किती निराळा दिसत होतास! शुभ्र रंगाचा लखनौचा झब्बा आणि त्याच रंगाचा पायजमा पेहरलेली तुझी उंचीपुरी मूर्ति पहिली आणि कधी कुणी अनुभवली नसेल अशी अनावर आकर्षणाची लाट उसळून आली माझ्या हृदयांत!!

एका हाताने दार ढकलून दुसऱ्या हाताची मिठी माझ्या-भोवती घालीत तूं म्हणालास, "पहातेस काय अशी? रागावलीस काय?" मी चटकन्‌ बोलून गेले, "अरे, कितीहि मोठा अपराध केलास तरी मी याक्षणी तुझ्यावर रागावणं शक्य नाही, इतका सुंदर दिसतो आहेस तूं आज! दारांत फुललेला शुभ्र प्राजक्त पाहिलास ना? थेट तस्सा वाटतोस तूं आत्तां! त्यालाहि नशा चढली आहे तुझ्यासारखीच— सुगंधाची!!" खोटया रागानं डोळे मोठे मोठे करीत तूं काय म्हणाला होतास आठवतं ना? "अग, त्या प्राजक्ताचं साम्य तुझ्याशीच जास्त दिसतंय्‌ मला! त्याच्या भरगच्च फुलां-

सारखंच तुझं पांढऱ्याशुभ्र साडीतलं अंगप्रत्यंग फुलून आलं आहे आणि प्राजक्तपुष्पाच्या देठांसारखी दिसणारी ही तुझ्या ओठांवरची नारिंगी लिपस्टिक-तुझ्या गळ्यांतली ही पोवळ्यांची माळ—हिच्या रंगाची नशा कुणाला चढणार नाही ? ''

अजूनहि तुझे ते शब्द, श्रावणांतली ती धुंद, मादक संध्याकाळ आठवते-- पुन्हां पुन्हां आठवते ! आज पुन्हां तोच श्रावण आवेगानं बरसतो आहे, तोच प्राजक्त भरगच्च कळ्याफुलांनी पुन्हां फुलून आला आहे, आणि संध्याकाळच्या या उदास घटकेला, शुभ्र साडीच्या पदरावरच्या पोवळ्याच्या माळेंतले मणि, तुझ्या आठवणीत घोळवीत असतांना मी मनांत म्हणते आहे, "श्रावण आला, पण तूं कुठं आहेस ? खरंच; तूं कुठं आहेस ? ''

--

# अश्रु-सरी

अनेक दिवसांच्या दीर्घ वियोगानंतरची ती आपली पुनर्भेट, अथांग, जलाशयांत उमटणाऱ्या अविचल अस्मानछायेप्रमाणं अंतरंगांत अक्षय्य आलेखित झाली आहे! विरहव्यथेनं भारावलेल्या आकाशाच्या घनगंभीर हृदयांत, चंचल विद्युल्लता कामनेच्या अनंत उर्मी उठवीत होती आणि पृथ्वीच्या अंतरांत दाटलेलं वियोगाचं अपार दुःख, सागराच्या उसळत्या लाटांच्या रूपानं क्षणाक्षणाला उचंबळून येत होतं. प्रीतीच्या प्राजक्तावर विरहानं मुग्ध झालेल्या कळ्या झुरत होत्या नि शीतल वायुलहरींचो प्रेमकूजितें करणारा पर्जन्य त्यांना मीलनाच्या वर्षावानं फुलवीत होता. अशा धुंद धूसर क्षणी, अचानक समोर उभी राहिलेली तुझी आकृति पाहून आनंदाच्या आवेगानं माझं काळीज क्षणभर जागच्या जागीच थांबलं! तुझ्या मनोहर मूर्तीच्या चिंतनांत घालवलेल्या घटकाच जणू तुझ्या रूपानं साकार होऊन आल्या असा मला भास झाला. तुझ्या श्यामल मुखावरच्या मधुर स्मितांत आकंठ बुडालेले डोळे, तुझ्या भावपूर्ण नयनांची भेट होतांच आतुरतेच्या असह्य उर्मींनं भारावून खाली वळले आणि तुझ्या चिरपरिचित बाहूंच्या बंधनांत विसावलेली काया, सुखानुभूतीच्या उन्मादक कळ्या-फुलांनी बहरून जात असतांनाच, रात्रीच्या उदरांत लपलेल्या पहांटेच्या दवबिंदूप्रमाणं इतके दिवस हृदयांत सांठलेलं दुःख, अश्रूंच्या रूपानं डोळ्याबाहेर सांडूं लागलं! आत्यंतिक आनंदाच्या क्षणी रडणाऱ्या मला बघून तुझ्या डोळ्यात उमट-लेलं प्रश्नचिन्ह मी जाणलं, पण सुखाची परमावधि झाल्यावर आधी सोसलेल्या दुःखाला पूर्णविराम देणारे बिंदु म्हणजेच हे सुखाच्या क्षणी येणारे अश्रू, किंवा दुःखानं रित्या झालेल्या हृदयांतलं तृप्तीचं माप कांठोकाठ भरल्यावर बाहेर सांडणारे आनंदाचे थेंब म्हणजेच हे अश्रू, अथवा सुखाच्या डोहांत आकंठ बुडून जात असतांना कोसळणारी जाणिवेची नक्षत्रं म्हणजेच हे ऐन आनंदाच्या क्षणी येणारे अश्रू होत, हे रहस्य मी तुला सांगू शकले नाही, कारण सुखदुःखाच्या उत्कट अनुभूतीवांचून तें उमगणं अशक्य आहे!!

# अमृत

जहांगीर आर्ट गॅलरीत कुठलंसं चित्राचं प्रदर्शन होतं ते पहायला आपण बरोबर गेलो होतो त्या दिवशी. एकादी सुंदर कलाकृति पाहिली की अभिप्रायांत्मक नजरेनं तूं माझ्याकडे पाह्यचास, जणू ते चित्र पाहून माझ्या मनांत तुझ्याचसारखे विचार आलेत की काय हे तुला जाणून घ्यायच होतं. पहात पहात आपण अशाच एका सुंदर चित्राजवळ आलो नि मी एकदम थबकले. सायंकाळच्या धूसर रम्य प्रकाशात झाडाच्या फांदोवर एकमेकांच्या चोंचीत चोंच घालून जगाला विसरलेल्या पोपटाच्या जोडीचं ते चित्र होते. विव्हल झालेल्या मादीनं असहाय्यतेनं मान मागे टाकली होती नि खटयाळ डोळयांचा नर लाडीक वाकडया मानेनं चंचुमीलनांत गुंगला होता तरीं त्याच्या अर्धमिटल्या पंखात प्रभुत्वाची स्पष्ट निशाणी व्यक्त होत होती. ते चित्र पाहून आपण दोघांनीहि एकमेंकांकडे पाहिलं. तुला जणू सुचवायचं होतं, की एकांताच्या धुंद क्षणात मीहि अशीच विव्हल, असहाय्य होते नि स्वतःला हवं ते मिळवूनही तू माझ्यावर मात करतोस. तुझा अभिप्राय मला समजला नि मी तो स्मितात लपवून पुढे सटकले. बरीच चित्रं पाहून आपण बाहेरच्या दरवाज्याजवळ आलो. तिथं शेवटच्या चित्रांत शुभ्र नाजूक केतकीच्या झाडाला एक काळाशार नाग विळखा घालीत आहे असं दाखविलं होतं. तूं चटकन माझ्याकडे पाहिलंस आणि तुझ्या सुचक नजरेतला विचार मी तेव्हांच ओळखला! नि बाहेर पडता पडता मी उद्गारले, "केतकीला विळखा घालून दंश करणाऱ्या नागाला काय माहीत, की त्याच्या दंशाचं विष, मधुर वेदनांचे वळसे घेतघेत तिच्या देहात भिनलं की त्याचं सुगंधी अमृत होऊन तिच्या हृदयांत साठतं म्हणून!"

--

# उदबत्ती

सुगंधाच्या वलयांत कणाकणानं लय पावणारी उदबत्ती समोर जळत होती, पण तुझे डोळे मात्र जवळच्या परडीतल्या टपोऱ्या गुलाबावर खिळले होते अंतरींद्रियालाच जाणवणाऱ्या, आत्मार्पणाच्या सात्विक सुवासानं तुझं चित्त कधीच आकृष्ट झालं नाही, पण अशाश्वत सौंदर्याच्या मायावी कस्तुरीमृगा-जवळील अज्ञात सौरभाला भुलून त्याच्या पाठलागावर बेदरकार शिकाऱ्याच्या अभिनिवेशांत फिरणाऱ्या तुला काय म्हणावं हेच कळत नाही मला! स्वत: जळून तुझं जीवन सुगं-धित करण्यासाठी मी जो आत्मयज्ञ केला तिकडे तुझं लक्ष कधीच वेधलं नाही. पण तुझ्या उसळत्या पौरुषाची पूजा बांधा-यला, यौवनाच्या सुवासानं दरवळणाऱ्या, लावण्याच्या गुलाबांनी भरलेली देहाची परडी मी तुझ्या पावलांवर अर्पण केली तेव्हां मात्र तुझा मनोभृंग त्या पुष्पदलांच्या मंजुषेत अहोरात्र बंदीवान होऊन रहायला कसा राजीखुषी झाला हे गूढ मला अजून उकलत नाही. परंतु तुला हे कसं कळत नाही की धुराच्या रेषेत स्वत:चं अस्तित्व जाळून टाकणारी उदबत्ती, शुद्ध सात्वि-काच्या पायवाटेनं जाऊन अनंतात विलीन होते तर सुवासाच्या सोनेरी जाळ्यात स्वत.सह दुसऱ्यालाही गुरफटून टाकणारा गुलाब, राजसाच्या राजमार्गातच घोटाळत राहतो. म्हणून म्हणते, राजसाच्या बंधातून जीवाला मुक्त करण्यासाठी सात्वि-काच्या सोपानमार्गानं चढून जादून, परब्रम्हाच्या पायरीवर पाऊल ठेवतांना उदबत्तीच्या रेषेप्रमाणं अनंतांतच विलीन व्हावं लागतं !

# अथांग

सागर अथांग आहे म्हणतात, पण त्याचाही ठाव घेणारे पाणबुडचे आहेतच. परंतु शिंपल्यात बंदिस्त झालेलं रत्नाकराचं अमाप वैभव वेचताना,त्याच्या तळाशी दडलेली आसुरी संपत्ति, विषारी जिवाणूंच्या रूपानं दृष्टीला पडल्यावर त्यांच्या मनाला काय बरं वाटत असेल ? लाटांचे मौक्तिकबिंदू पृथ्वीच्या पावलांवर अर्पण करणाऱ्या सागराची, क्षुद्र शुक्तिकांची सांठवण पाहून मनाला किती खेद वाटत असेल त्यांच्या ? भरतीच्या वेळी चंद्रम्याच्या भेटीसाठी, उन्मत्त लाटांनी उचंबळून येणाऱ्या सागराचं, ओहोटीनं उघडं पडलेलं रुक्ष हृदय पाहवत असेल कां त्यांच्या डोळ्यांना ?

तुझ्या मनाचा सागरही अथांग आहे, पण मला मात्र त्याचा पुरता ठाव मिळाला आहे. औदार्याच्या अगाध ऐश्वर्याजवळ, क्रूरतेचा फणा काढून बसलेले विषारी नाग मला अनेकदां दिसले आहेत. तेजस्वी भावमौक्तिकांच्या राशीशेजारी उघड्या पडलेल्या भावहीनतेच्या क्षुद्र शिंपाही मी पाहिल्या आहेत. आणि प्रीतीच्या पौर्णिमेला हृदयचंद्राच्या भेटीसाठी उन्मादानं उसळणाऱ्या लाटांवर तरंगत असतांनाच, अज्ञात दुराव्याच्या ओहोटीनं रुक्ष झालेल्या तुझ्या हृदयावर मी अनेकदां ठेंचकाळून पडले आहे. म्हणून म्हणते, असा क्षणोक्षणी बदलणारा तूं, अथांग आहेस खरा !

—

# "चंदन"

... शरदाच्या शीतल कवळ्या उन्हांत न्हाऊन, तृप्तीच्या रंगीन फुलांनी सर्वांगी बहरलेल्या सस्यशामला धरतीच्या सुखावलेल्या स्वरुपाकडे पाहतांना, अंतरंगातल्या गोड गोड आठवणींची इवलाली नाजूक फुलपाखरं पुन:प्रत्ययाच्या मधूकोषातला मकरंद लुटण्यासाठी बाहेर उडू लागतात. त्यांना शब्दांच्या सोनेरी मुठीत पकडून ठेवण्याचा वेडा प्रयत्न मी नेंहमी करीत राहते !

...उत्कट प्रीतीच्या लाटांनी उचंबळून येणाऱ्या सागराचं संध्यारागांत रंगलेलं क्षुब्ध-मनोहर रुप पाहतांना मीलनाच्या क्षणी आसक्तीच्या रंगानं आरक्त झालेल्या तुझ्या धुंदमधुर नयनांची आठवण होते आणि सुखस्मृतींच्या स्वाती बिंदुंचा पाऊस अवयवांच्या किनाऱ्यावर कोसळू लागतो. त्या अवखळ बिंदुंना शब्दांच्या शिंपल्यात सांठवून, काव्याची मुक्तामाला गुंफण्याचा निष्फळ यत्न मी सदैव करते !

..पण मौनाच्या आवरणांत लपलेली तुझी भावना, शब्दांच्या आरशांत आपलं फुललेलं स्वरुप कधीच पहात नाही याचं नवल वाटतं मला ! निकट सान्निध्यांत तृप्तीच्या सुगंधानं दरवळणाऱ्या हृदयपरागांतल्या मधुबिंदूचा आस्वाद घेऊन, अधरदलावाटे बाहेर झेपावणाऱ्या शब्दभ्रमराचा गोड गुंजारव मी कधीच आवरू शकत नाही, पण नभिकमलात सौरभसंपत्तीची सांठवण करणाऱ्या कस्तुरी-मृगाप्रमाणे ऐन उन्मादाच्या क्षणीसुद्धा मनांत पाझरणाऱ्या अमृतानंदाची छोटीशी शब्दलकेरही तुझ्या मुखावाटे बाहेर येंत नाही याचाच विस्मय वाटतो मला !

..पण तसं कशाला ? उमलत्या फुलाचा सुगंध वाऱ्याच्या एवढ्या झुळकीनंही दशदिशांत पसरतो. पण आत्यंतिक सुवास पोटांत लपविणाऱ्या चंदनाच्या खोंडाप्रमाणं, आग्रहाच्या सहाणेवर उगाळल्याशिवाय किंवा रोषाच्या अग्नीचा स्पर्श झाल्याशिवाय तूं सुद्धां आपला भावसुगंध प्रकट करीत नाहीस, म्हणून म्हणते, चंदनासारखा सुवासिक असलास तरी त्याच्याच सारखा विरघळायला कठीण आहेस तूं –!

REFBK-0022862
REFBK-0022862